शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून तंत्र शिक्षण संचालनालयांतर्गत कार्यरत शासकीय व शासकीय अनुदानित तंत्रनिकेतनातील/तंत्रसंस्थांतील अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील अभियांत्रिकी/ औषधनिर्माणशास्त्र पदविका अभ्यासक्रमासाठी प्रवेश क्षमतेत बदल व नवीन अभ्यासक्रमांना मान्यता व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्र शिक्षण विभाग
शासन निर्णय क्र. मान्यता २००७/(११८/०७)/तांशि-६
~~मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०००३२~~
दिनांक:- १३ जुलै, २००७

संदर्भ:- १) शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग क्र. ३३८२/११८३६/(१९०)/तांशि-३ १अ, दिनांक २१ मे, १९८३

२)शासन निर्णय, उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. मान्यता २००६/(१८७/०६)/तांशि-६, दिनांक १९ मे, २००७

३) संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य यांचे पत्र क्र. १०/एनजीपी/ पदविका प्रस्ताव/२००७/१२०, दि:६ जून, २००७

४) विभागाचे पत्र क्र. मान्यता २००६/(१८७/०६)/तांशि-६, दिनांक २७ जून, २००७

**शासन निर्णय:-** सन २००७-०८ या शैक्षणिक वर्षासाठी अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या अखत्यारितील पदविका अभ्यासक्रम (अभियांत्रिकी/औषधनिर्माणशास्त्र) राबविणाऱ्या संस्थेतील प्रवेश क्षमतेत बदल, नवीन अभ्यासक्रमांना मान्यता व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषदेच्या मार्गदर्शक तत्वानुसार यासाठी संदर्भ क्र. २ अन्वये राज्यस्तरीय समितीची स्थापना करण्यात आली होती. सदरहू समितीच्या शिफारशी संचालनालयाने संदर्भ क्र. ३ अन्वये सादर केल्या होत्या व तदनुषंगाने या शिफारशी संदर्भ क्र. ४ अन्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आल्या होत्या. सदर शासन निर्णयासोबत जोडलेल्या **प्रपत्र अ, ब, क व ड** मध्ये प्रत्येक संस्थेसमोर नमूद केलेल्या पत्रान्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेने कळविल्यानुसार राज्यातील पदविका स्तरावरील संस्थांना त्यांच्या नावासमोर दर्शविल्याप्रमाणे सुधारित प्रवेश क्षमता बदल, नवीन अभ्यासक्रम सुरु करण्यास व सध्या सुरु असलेल्या अभ्यासक्रमांना मुदतवाढ देण्यास शैक्षणिक वर्ष २००७-०८ पासून पुढील अटी व शर्तींच्या अधीन राहून शासन मान्यता देत आहे:

१) शासकीय तसेच शासकीय अनुदानित तंत्र शिक्षण संस्थांना परवानगी देण्यासाठी शासनाने विहित केलेल्या अटी संस्थांवर बंधनकारक असतील.

२) शासनाने विहित केलेल्या तसेच अखिल भारतीय तंत्र शिक्षण परिषदेकडून यापुढे विहित करण्यात **येणाऱ्या सर्व अटी व शर्ती मान्य असल्याबाबत संबंधित संस्थेस करारनामा करावा लागेल.**

C:\DOCUME~1\xyz\MYDOCU~1\GR1C6A~1.200\TE-6.doc

Prof. V. R. Rao
Principal
Cusrow Wadia Institute of Technology
19, Bundgarden Road, Pune-1.